शुक्रवार दि.३० ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३६०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता
बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## मुख्यमंत्री शिदेंनी काढली केसरकरांची खरडपट्टी

# शिक्षण विभागाच्या अनास्थेमुळे सरकारची प्रतिमा मलिन होत असल्याचे सुनावले खडेबोल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटना तथा बदलापूरच्या प्रकरणामुळे सरकारची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन होत असल्याच्या मुद्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या मंत्र्यांवर चांगलेच नाराज झालेत. त्यांनी या प्रकरणी वादग्रस्त विधान करणाऱ्या शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची चांगलीच खरडपट्टी काढली. शिक्षण विभागाच्या अनास्थेमुळे राज्यात सरकारची प्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे केवळ कारवाईच्या घोषणा नको, थेट कृती करा, अशा शब्दांत शिंदे यांनी दीपक केसरकर यांना समज दिल्याचे आज पुढे आले आहे.

बदलापूर येथील एका शाळेत २ चिमुकल्यांचे लैंगिक शोषण झाले होते. या प्रकरणाचे राज्यभर पडसाद उमटले होते. विरोधकांनी या प्रकरणी महाराष्ट्र बंदची घोषणाही केली होती. पण मुंबई हायकोर्टाच्या हस्तक्षेपामुळे हा बंद मागे घेण्यात आला होता. या घटनेवरून सरकारवर टीकेची झोड उठली असताना गत सोमवारी २६ ऑगस्ट रोजी राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. यामुळे पुन्हा एकदा विरोधकांच्या हाती आयते कोलित सापडले. या दोन्ही घटनांमुळे महायुती सरकारपुढे विचित्र स्थिती निर्माण झाली आहे.विशेषतः मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महायुती सरकारची राज्यभर चांगली प्रतिमा निर्मिती होत असताना या दोन्ही घटना घडल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चांगलेच संतापलेत. त्यामुळे त्यांनी बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना चांगलेच खडेबोल सुनावले. शिक्षण विभागाच्या अनास्थेमुळे राज्यात सरकारची प्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे केवळ कारवाईच्या घोषणा करू नका, तर प्रत्यक्ष कृती करा. शाळांमध्ये मुलींच्या रक्षणासाठी कठोर उपाययोजना करा, असे एकनाथ शिंदे यावेळी केसरकर यांना उद्देशून म्हणाले.



दुसरीकडे, बदलापूर लैंगिक शोषण घडलेल्या शाळेतील १५ दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज गायब झाल्याचेही समोर आले आहे. शिक्षण विभागाच्या चौकशीतून ही बाब स्पष्ट झाली आहे. स्वतः दीपक केसरकर यांनी ही माहिती दिली. विशेषतः ही बाब शाळेच्या पदाधिकाऱ्यांना माहिती असूनही त्यांनी या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, मी पीडित मुलींच्या कुटुंबीयांची भेट घेणार आहे. या मुलींच्या शिक्षणाची जबाबदारीही मी स्वतः घेत आहे. यापुढे तिच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची माझी असेल.बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणात अक्षय शिंदे नामक स्वच्छता कर्मचाऱ्यांवर २ अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. अक्षय शिंदे सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या २ सदस्यीय समितीने आपला प्राथमिक अहवाल सरकारला सादर केला अआहे. तर पोलिसांच्या एसआयटीने आरोपीच्या दोन्ही बायकांची चौकशी केली आहे. त्याच्या तिसऱ्या पत्नीचीही या प्रकरणी लवकरच चौकशी केली जाईल असे सांगितले जात आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४ डिसेंबर २०२३ रोजी एका दिमाखदार कार्यक्रमात या पुतळ्याचे अनावरण केले होते. हा पुतळा २६ ऑगस्ट रोजी दुपारी अचानक कोसळला. हा पुतळा नेमका कशामुळे कोसळला? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण यामुळे जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. बदलापूर प्रकरणानंतर लगेचच ही घटना घडल्यामुळे सरकारपुढे विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.

# खाजगी सावकारी प्रकरणात पडलेली धाड दाबून टाकण्यातच अधिकाऱ्यांचा कल

## सहकार अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**



धर्माबाद शहरातील एक खाजगी सावकारी करणारा व्यक्ती अवाच्या सव्वा व्याज वसूल करून पीडित अर्जदाराचे आर्थिक शोषण केले होते त्यानुसार अर्जदाराने या प्रकरणी सहकार अधिकारी यांच्या कर्यालयात रीतसर तक्रार दाखल केली होती त्यानुसार छापा मारण्यात आला पण मिळालेल्या आर्थिक मलिद्या मुळे हे प्रकरण दाबून केवळ कडे भर दिला असल्याची बोलल्या जात आहे.

पीडित अर्जदाराला न्याय मिळेल अशी अपेक्षा होती पण पुन्हा एकदा धनशकती पुढे कायद्यास बगल देऊन कारवाईत ढील देण्यात आल्याचा प्रकार घडला की काय असा संशय हे प्रकरण पाहून निर्माण होत आहे. शहरात स्वतःहून धाड टाकून खाजगी सावकारी चा पर्दाफाश करण्याचे अधिकार सहकार अधिकारी यांच्या कडे आहेत मात्र ते कधीच असे करत तर नाहीतच उलट कोणी धाडस करून तक्रार दाखल केली तर धाड टाकतात सगळयात महत्वाचे म्हणजे धाड टाकण्या पूर्वीच त्या धाडीची सगळी खबर त्या सावकाराला कळते मग हा गोपनियतीचा भंग होत नाही का? आणि हे कळवणारे कोण आणि एव्हढ सगळ पडद्या आड ठरवून केले जात असेल तर धाडीत मुद्देमाल किंवा रेकॉर्ड कसे सापडतील परिणामी खाजगी सावकारी करणारा मोकाट असतो आणि पीडित तक्रारदार मात्र त्रस्त असतात. पैशाच्या देवाण घेवाण मधूनच असे प्रकार घडतात अवाच्या सव्वा व्याज दर आकारून जास्तीची लूट केली जाते त्यामुळे हे प्रकरण सहकार अधिकारी यांच्या कसे पोहचते धाड टाकून जर तिथे मुद्देमाल किंवा पैश्याच्या देवाण ची तपशील सापडत नसतील तर धाडीचे महत्व काय उरेल आणि धनदांडगे सावकार कायद्याला कसे भितील ? धर्माबाद शहरात धाड टाकून सहकार अधिकारी यांनी करवाई सुरुवात केली पण त्यातून संबधीत खाजगी सावकाराला अनेक देण्यात आलेली ढील पाहता खाजगी सावकारी वर नियंत्रण आणण्यासाठी करवाई होती की केवळ प्रकरण दाबन्यासाठी मोठी आर्थिक उलाढाल झाली याची शहरात वेगवेगळी चर्चा होत आहे. सहकार विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालून निर्माण होणारे प्रश्न सोडवावेत व कायद्याचे पावित्र्य कायम ठेऊन पीडित अर्जदारास न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.

# शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी करून घ्यावे-प्रा.संजय खडसे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दिनांक १ ऑगस्ट २०२४ पासून खरीप हंगाम २०२४ करिता शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकाची ई पीक पाहणी करून घ्यावी असे आवाहन सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांनी केलेले आहे.शेतकरी यांनी आपल्या शेतामध्ये जे पीक पेरले आहे त्या पिकाची नोंदणी ई पीक पाहणी पद्वारे करावे.

खरीप पीक हंगामाची तारीख १५ सप्टेंबर पर्यंत असून यानंतर रब्बी हंगाम सुरू होणार असल्याने खरीप हंगामासाठी मुदत वाढ मिळणार नाही.सर्व शेतकर्यांनी ई पीक पाहणी करून घ्यावी.

ई पीक पाहणी न केल्यास यानंतर आपणास नैसर्गीक आपत्ती अनुदान, पीक विमा तसेच त्यासंबंधी शासनाचे लाभ ई पीक पाहणीच्या आधारे मिळणार आहेत याची नोंद घ्यावे. शासनाने वेळोवेळी जाहीर केलेली मदत ही ई पीक पाहणी च्या आधारे दिल्या जात आहे. .यापुढील अनुदान सुद्धा हे ई पीक पाहणीच्या आधारा वर दिल्या जाणार आहे.याची सर्व शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी त्यामुळे सिंदखेडराजा उपविभागामधील सर्व



शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी करून घ्यावी असे कळकळीचे आवाहन सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी केलेले आहे.आज मा.उपविभागीय अधिकारी साहेब सि.राजा आणि मा.तहसीलदार साहेब सिंदखेडराजा राजा व तलाठी गिरी , संतोष इंगोले आकाश माघडे कोतवाल यांनी येथील श्री.विष्णू राघोजी तायडे स न १४६ मधील ०.३२०० जमिनी मध्ये आज दि.२७/०८/२०२४ रोजी मोबाईल प द्वारे ई पीक पाहणी करण्यात आली.तसेच सिंदखेडराजा येथील लखन देशमुख,प्रकाश देशमुख,रामदास मेहेत्रे, प्रविण चौधरी,विशाल चौधरी,आणि सर्व शेतकरी उपस्थित होते.व सिंदखेडराजा तालुक्यातील सर्व शेतकरी यांना मोबाईल द्वारे इ पीक करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

# डॉ.संघर्ष सावळे यांना भारत शिक्षण पुरस्कार २०२४ जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवत**



दि.५ सप्टे २०२४ रोजी राष्ट्रीय शिक्षक दिन संपूर्ण भारतात महत्वाचा मानला जातो. त्या निम्मित टॉप १०० इंडिया शिक्षक - प्राध्यापक - संशोधक - लेखक वरच्युअल शो भारत शिक्षण पुरस्कार व एजूकेशन कनेक्ट प्लस मॅगझीन द्वारे डॉ संघर्ष सावळे यांची शैक्षणिक व सामाजिक प्रगती बघुन त्यांना भारत शिक्षण पुरस्कार २०२४ जाहीर केला आहे.

डॉ. संघर्ष सावळे हे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इतर राज्यात व विदेशात ही त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा ठसा दिसून येतो. याही अगोदर त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे अनेक पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कार जाहीर झाल्या नंतर सर्वत्र त्यांच्या वर मित्र मंडळी कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




आज दि.२९ रोजी दैनिक भारत संग्राम चे जिल्हा प्रतिनिधी सचिन भाऊ खंडारे, ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समिती चे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष बबनराव सरकटे व वृतमास्टर चे संपादक रामदास कहाळे यांनी ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल लोकनेता कार्यालयात सत्कार करून शुभेच्छा दिल्या. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)

# चैतन्य विद्यालयात आरोग्य तपासणी व लसीकरण संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयात मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र ओतूर यांच्या वतीने इयत्ता १० तील मुलांची व मुलींची आरोग्य तपासणी व लसीकरण केल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.महाराष्ट्र शासन यांच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाअंतर्गत विद्यालयातील इयत्ता १० वी इयत्तेत शिकणाऱ्या २५० विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य केंद्र ओतूरचे वैद्यकीय अधिकारी श्रीहरी सारोक्ते यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी व लसीकरण करण्यात आले. यात विद्यार्थ्यांचा आहार व विहार याबबत मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य तपासणीत कान,नाक,घसा ,डोळे,त्वचेचे आजार, पोटाचे आजार, विद्यार्थ्याची वजन व उंची यांची तपासणी करून त्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या



आरोग्य तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र ओतूरचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीहरी सारोक्ते, समुदाय आरोग्य अधिकारी डॉक्टर ज्योती ढोक , डॉक्टर प्रमिला पलगडमल,आरोग्य सेवक सुनिल यादव, आरोग्य सहायिक सविता पगार, परिचारिका प्रमिला पवार यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.या आरोग्य तपासणी वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, उपमुख्याध्यापक संजय हिरे, पर्यवेक्षक अनिल उकिरडे , शिक्षक प्रतिनिधी संतोष सोनवणे , विशाल चौधरी आदी उपस्थित होते.

## झाडे लावा झाडे जगवा

### चारोळी

उगाच पोकळ अपेक्षा कशास
जीवनी रंग स्वतःच भरावा
खडतर वाटा येतच राहतील
सुविचारांचा नको दुरावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी भिगवण मध्ये दिले विद्यार्थ्यांना सुरक्षेचे धडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण (ता.इंदापूर) पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांनी भिगवण पोलीस स्टेशन हद्दीतील थोरात माध्यमिक विद्यालया मधील विदयार्थी आणि विद्यार्थिनींना Good touch, Bad touch वेळीच कसे ओळखायचे,त्याचप्रमाणे सायबर,विनयभंग, पोस्को,गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

लहान विद्यार्थ्यांनी मोटरसायकल न चालवणे बाबत समज देण्यात आली,विद्यार्थी मोटरसायकल चालविताना मिळून आल्यास त्यांच्यावर आणि त्यांच्या पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत सूचना देखील करण्यात आली. विद्यार्थी,विद्यर्थिनींबाबत रस्त्याने येताना जाताना एखादे गैरकृत्य,पाठलाग यासारखे काही प्रकार होऊ नयेत याकामी सर्वांना भिगवण पोलीस स्टेशन आणि अधिकारी यांचे संपर्क नंबर देण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांना भिगवण पोलिसांची मदत लागल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# बीड शहर बचाव मंचचे न.प.सि.ओ.निता अंधारे हटावची जिल्हाधिकाऱ्या कडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहर बचाव मंच, न.प, सि.ओ.निता अंधारे हटाव यांची मागणी बीड नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांची तात्काळ बदली करा बीड शहर बचाव मंचाचा गंभीर इशारा नितीन जायभाये, सीपीआय जिल्हा सचिव भाऊराव प्रभाळे, बीड शहर काँग्रेस अध्यक्ष , परवेज भाई कुरेशी, आम आदमी पार्टी जिल्हा अध्यक्ष अशोकदादा येडे, समाजसेवक फैयाज भाई सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राज्य सचिव मीनाक्षीताई देवकते, अमजदभाई कुरेशी, अशोक वाघमारे, नानाभाऊ लव्हारे आधी शिष्टमंडळात उपस्थित होते. मुख्याधिकारी यांनी केलेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करा व यांची तात्काळ बदली करण्यात यावी. बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे गेल्या अनेक महिन्यापासून बीड शहरातील सर्वच भागांना २५ दिवसांना एकदा पाणी दिले जाते. ३६५ दिवसांची नळपट्टी,पाणीपट्टी आकारली जाते . यामुळे नागरिकांमध्ये संताप पसरलेला आहे. पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे गेल्या पाच महिन्यापासून वेतन देण्यात आलेले नाही. पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच आंदोलन करून ,उपोषणही केलेले आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे पूर्ण नियोजन कोलमडलेले आहे. वीज महावितरण कंपनीच्या थकबाकी मध्ये दिवसेंदिवस फार मोठी वाढ होत चालली आहे. महावितरण कंपनीच्या थकबाकीचा डोंगर सध्या नगरपालिकेच्या डोक्यावर वाढत चाललेला आहे. अशाही परिस्थितीमध्ये नगरपालिकेच्या विविध विभागांची करवसुली चांगल्या प्रकारे होत असल्याचे दिसून येत आहे. परंतु गुत्तेदारांची विले काढण्यातच मा.नीता अंधारे ह्या व्यस्त आहेत. नगरपालिकेच्या विद्युत विभाग व पाणीपुरवठा विभागामध्ये विद्युत साहित्य तसेच इतर साहित्यांचा प्रचंड प्रमाणामध्ये तुटवडा झालेला आहे अशी कर्मचाऱ्यांमध्ये बोंब आहे. आम्ही वारंवार पाठपुरावा करूनही साहित्यांची खरेदी केली जात नाही.

यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. कर्मचाऱ्यांना विद्युत साहित्याची उपलब्धता होत नाही आपापल्या भागांमध्ये नवीन पथदिवे व जुन्या पथदिव्यांच्या दुरुस्ती अभावी सर्व नागरिकांना व विशेष करून महिलांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.

बीड शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या दोन वर्षापासून नवीन रस्ते नाल्या हे सर्वच कामे बंद आहेत. यासंदर्भात नागरिक ठीक ठिकाणी आंदोलनाच्या पवित्र्यात रोजच दिसत आहेत . श्रीमती नीता अंधारे यांच्या कामांची चौकशी करण्याचे मथळे रोज वर्तमानपत्रांमध्ये छापून येत असताना दिसतात. यासर्व कार्यशैलीला नागरिक प्रचंड वैतागले आहेत. एकंदरच बीड शहराची अवस्था अतिशय हालाखीची व दयनीय होत चाललेली आहे.तरी बीड शहरातील सर्व नागरिकांच्या वतीने आम्ही जिम्मेदारीपूर्वक मागणी करतो की , बीड नगर परिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी निता अंधारे यांची तात्काळ बदली करण्यात यावी व त्यांनी आजपर्यंत केलेल्या सर्व कामांची सखोल व कसून चौकशी करण्यात यावी. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी या सर्व गोष्टींमध्ये तात्काळ लक्ष घालून नागरिकांच्या सर्व मागण्या शासन दरबारी पोहोचवून , मुख्य अधिकारी निता अंधारे यांची तात्काळ बदली करून बीड शहरातील नागरिकांना न्याय मिळवून द्यावा. तसेच बीड शहरासाठी सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक लवकरात लवकर करण्यात यावी. नसता बीड शहरातील नागरिक लवकरच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करतील असा इशारा देण्यात येत आहे. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी या संदर्भात बीड शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ लक्ष घालावे अतिशय अकार्यक्षम अधिकारी आहेत कारण यांनी कार्यभार सांभाळल्यापासून आज पर्यंत बीड शहराची अवस्था



अतिशय दयनीय झालेली आहे व सर्वच भागातील सर्व स्तरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. बीड शहरातील सर्वच भागांमध्ये अनेक महिन्यांपासून कचऱ्या गोळा करणाऱ्या घंटागाड्या बंद आहेत. घंटा गाड्यांचे पेमेंट्स वेळेवर दिल्या जात नाहीत. यामुळे शहराच्या अनेक भागांमध्ये ठिकठिकाणी, गल्लोगल्ली कचऱ्याचे ढीगच्या ढीग लागले आहेत. या कचऱ्याच्या ढिगार्यांमुळे सर्वच भागांमध्ये दुर्गंधीचे साम्राज्य व रोगराई पसरलेली आहे, नीता अंधारे यांनी कार्यभार सांभाळल्यापासून आजपर्यंत कधीही शहरामध्ये रोग प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी केलेली नाही. त्यामुळे शहराच्या सर्वच भागांमध्ये साथीच्या रोगांचे प्रादुर्भाव झालेले दिसत आहेत, यांनी केलेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करा व यांची तात्काळ बदली करण्यात यावी. बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे गेल्या अनेक महिन्यापासून बीड शहरातील सर्वच भागांना २५ दिवसांना एकदा पाणी दिले जाते. ३६५ दिवसांची नळपट्टी,पाणीपट्टी आकारली जाते . यामुळे नागरिकांमध्ये संताप पसरलेला आहे. पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे गेल्या पाच महिन्यापासून वेतन देण्यात आलेले नाही. पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच आंदोलन करून ,उपोषणही केलेले आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे पूर्ण नियोजन कोलमडलेले आहे. वीज महावितरण कंपनीच्या थकबाकी मध्ये दिवसेंदिवस फार मोठी वाढ होत चालली आहे. महावितरण कंपनीच्या थकबाकीचा डोंगर सध्या नगरपालिकेच्या डोक्यावर वाढत चाललेला आहे. अशाही परिस्थितीमध्ये नगरपालिकेच्या विविध विभागांची करवसुली चांगल्या प्रकारे होत असल्याचे दिसून येत आहे. परंतु गुत्तेदारांची विले काढण्यातच मा.नीता अंधारे ह्या व्यस्त आहेत. नगरपालिकेच्या विद्युत विभाग व पाणीपुरवठा विभागामध्ये विद्युत साहित्य तसेच इतर साहित्यांचा प्रचंड प्रमाणामध्ये तुटवडा झालेला आहे अशी कर्मचाऱ्यांमध्ये बोंब आहे. आम्ही वारंवार पाठपुरावा करूनही साहित्यांची खरेदी केली जात नाही. यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. कर्मचाऱ्यांना विद्युत साहित्याची उपलबधता होत नाही आपापल्या भागांमध्ये नवीन पथदिवे व जुन्या पथदिव्यांच्या दुरुस्ती अभावी सर्व नागरिकांना व विशेष करून महिलांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.

बीड शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या दोन वर्षापासून नवीन रस्ते नाल्या हे सर्वच कामे बंद आहेत. यासंदर्भात नागरिक ठीक ठिकाणी आंदोलनाच्या पवित्र्यात रोजच दिसत आहेत . श्रीमती नीता अंधारे यांच्या कामांची चौकशी करण्याचे मथळे रोज वर्तमानपत्रांमध्ये छापून येत असताना दिसतात. यासर्व कार्यशैलीला नागरिक प्रचंड वैतागले आहेत. एकंदरच बीड शहराची अवस्था अतिशय हालाखीची व दयनीय होत चाललेली आहे.तरी बीड शहरातील सर्व नागरिकांच्या वतीने आम्ही जिम्मेदारीपूर्वक मागणी करतो की , बीड नगर परिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी श्री. निता अंधारे यांची तात्काळ बदली करण्यात यावी व त्यांनी आजपर्यंत केलेल्या सर्व कामांची सखोल व कसून चौकशी करण्यात यावी. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी या सर्व गोष्टींमध्ये तात्काळ लक्ष घालून नागरिकांच्या सर्व मागण्या शासन दरबारी पोहोचवून , मुख्य अधिकारी निता अंधारे यांची तात्काळ बदली करून बीड शहरातील नागरिकांना न्याय मिळवून द्यावा. तसेच बीड शहरासाठी सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक लवकरात लवकर करण्यात यावी. नसता बीड शहरातील नागरिक लवकरच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करतील असा इशारा देण्यात येत आहे. तरी माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी या संदर्भात बीड शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ लक्ष घालावे अतिशय अकार्यक्षम अधिकारी आहेत कारण यांनी कार्यभार सांभाळल्यापासून आज पर्यंत बीड शहराची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे व सर्वच भागातील सर्व स्तरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. बीड शहरातील सर्वच भागांमध्ये अनेक महिन्यांपासून कचऱ्या गोळा करणाऱ्या घंटागाड्या बंद आहेत. घंटा गाड्यांचे पेमेंट्स वेळेवर दिल्या जात नाहीत. यामुळे शहराच्या अनेक भागांमध्ये ठिकठिकाणी, गल्लोगल्ली कचऱ्याचे ढीगच्या ढीग लागले आहेत. या कचऱ्याच्या ढिगार्यांमुळे सर्वच भागांमध्ये दुर्गंधीचे साम्राज्य व रोगराई पसरलेली आहे, नीता अंधारे यांनी कार्यभार सांभाळल्यापासून आजपर्यंत कधीही शहरामध्ये रोग प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी केलेली नाही. त्यामुळे शहराच्या सर्वच भागांमध्ये साथीच्या रोगांचे प्रादुर्भाव झालेले दिसत आहेत.

## मुळुकवाडी जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांकडुन बाथरूम स्वच्छता

# धक्कादायक प्रकाराची शिक्षण विभागाकडून दखल विस्तार अधिका-यांची शाळेला भेट-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड तालुक्यातील मुळुकवाडी जिल्हा परिषद शाळेतील मुलांकडुन बाथरूम स्वच्छता करायला लावत असल्याचा व्हिडिओ काल दि.२८ मंगळवार रोजी एका ग्रामस्थाने काढून सोशल मिडीयावर अपलोड केला होता. याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर शिक्षण विभागाकडून या धक्कादायक प्रकाराची दखल घेत आज दि.२९ बुधवार रोजी सकाळी शिक्षणाधिकारी यांच्या सुचनेवरून विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, केंद्र प्रमुख आबासाहेब हांगे यांनी शाळेला भेट देऊन पाहणी केली.तसेच शाळेतील पालक आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. संबंधित प्रकरणाचा चौकशी अहवाल वरीष्ठांना सादर करणार असल्याचे सांगत भविष्यात अशा दुर्दैवी घटना घडु नये याची दक्षता घेण्याची सुचना केली.



बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथे १ ते ४ थी पर्यंत जिल्हा परिषदेची शाळा असुन ५२ विद्यार्थी पटसंख्या असुन दोन शिक्षक कार्यरत आहेत.परंतु एक पद रिक्त असल्याने तात्पुरती सोय म्हणून नागोबा शिक्षक केकाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.काल दि.२८ रोजी त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेचे बाथरूम स्वच्छ करायला लावले. गावातील काही जणांनी या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला होता याबद्दल सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती घरत यांनी काल दि.२८ रोजी मी एक दिवसाच्या रजेवर होते. मी या शाळेत ७ वर्षांपासून कार्यरत असुन या शाळेत पहिली ते ४ थी पर्यंत ५२ विद्यार्थी आहेत. शाळेत शिपाईपद नसल्याने अनेकदा स्वच्छतेची कामे विद्यार्थ्यांना सांगितली जातात. स्वच्छता व ईतर कामांसाठी कसलाही निधी नसतो मात्र बाथरूम स्वच्छतेचे काम करून घेण्यात येत नाही. कालचा प्रकार मला समजल्यानंतर याची माहिती घेऊन सहशिक्षक केकान यांना समज दिली आहे.शिक्षणाधिकारी यांनी मुळुकवाडी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांकडून बाथरूम स्वच्छता करून घेतल्या प्रकरणी चौकशी करण्यासाठी पाठवले असुन शाळेत केंद्र प्रमुख आबासाहेब हांगे यांच्या समवेत पालक, ग्रामस्थ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या सोबत चर्चा करून संबंधित प्रकरणाचा चौकशी अहवाल वरिष्ठांना पाठवला असल्याचे विस्तार अधिकारी मधुकर तोडकर यांनी सांगितले.बीड तालुक्यातील मुळुकवाडी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडुन बाथरूम स्वच्छता करण्याचा धक्कादायक प्रकार दुर्दैवी असुन बीड जिल्ह्यातील २४०० शाळांमध्ये शिपाई नसल्याने शाळेतील साफसफाई व ईतर कामे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना करावी लागत असुन शिक्षणमंत्री दिपक केसरकर आणि पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिपाई पदांची भरती करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# परिक्रमा सायन्स कॉलेजच्या महिला व पुरुष संघाची जिल्हा स्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

दिनांक २६/८/२०२४ दरम्यान परिक्रमा शैक्षणिक संकुल काष्टी येथे झालेल्या तालुकास्तरीय मुले/मुली शालेय फुटबॉल स्पर्धेत परिक्रमा सायन्स कॉलेजच्या१७ वर्ष मुले संघाने द्वितीय क्रमांक तर १९ वर्ष मुले, व १९ वर्ष मुली या संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून कोपरगाव येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार श्री.बबनरावजी पाचपुते,परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव श्री.विक्रमसिंह पाचपुते,मुख्य कार्यकारी अधिकारी ड.श्री.प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते,अकॅडमी डेप्युटी डायरेक्टर प्रा. संजीव कदम पाटील, प्राचार्य संजीवन महाडिक,प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ ,,प्रा.डॉ.सुदर्शन गिरमकर,प्राचार्य डॉ. रमेश शिंदे,प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्या डॉ.सुवर्णा निर्मळ,प्राचार्य जेम्स मेनन, यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.या खेळाडूंना प्रा.रवींद्र काळाने, प्रा.रोहन रंधवे यांचे मार्गदर्शन लाभले.

# काटकळंबा येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

## सभापती विक्रांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्ता संवाद बैठक संपन्न!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा युवा नेते विक्रांत पाटील शिंदे यांनी काटकळंबा येथे दि.२८ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले,



यावेळी विक्रांत दादा यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या,व काटकळंबा येथील बौद्ध समाज मंदिरा समोरील १० लक्ष रुपये कामाच्या फ्लेवर ब्लॉकचे उद्घाटनही यावेळी सभापती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी,नागरिकांशी सभापती विक्रांत पाटील शिंदे यांची संवाद बैठक संपन्न झाली, यावेळी सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी काटकळंबा गावातील नागरिकांच्या विविध अडीअडचणी जाणून घेतल्या, यावेळी गावकऱ्यांच्या वतीने सभापती विक्रांत पाटील शिंदे यांचा शाल पुष्पहार घालून भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी बोलताना सभापती विक्रांत पाटील म्हणाले की,लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून मतदारसंघातील व काटकळंबा गावातील विविध प्रलंबित विकास कामासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला असून यापुढेही काटकळंबा गावच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासणार नसल्याची ग्वाही यावेळी विक्रांत पाटील शिंदे यांनी दिली,

यावेळी काटकळंबाचे चेअरमन संभाजी पाटील पानपट्टे, राऊतखेडचे माजी सरपंच रणजीत पा. डिकळे,कौठाचे चेअरमन प्रताप देशमुख,चौकी महाकायचे सरपंच हनुमंत पा.कदम,तेलूरचे सरपंच राजू भंडारी,गंगाधर पा.चिखलीकर,माजी सरपंच राष्ट्रपाल चावरे,माधव हाम्पले,समद साहेब,किशनराव चावरे,शिवा आप्पा चोंडे,दत्ता पा.पवार,सुनील सुपलकर ,विठ्ठल लोहकरे, विठ्ठल बस्वदे,तुळशीराम चावरे,मा.तंटामुक्ती अध्यक्ष माधव कांबळे,शादुल सय्यद,केशवराव पा बस्वदे,नरेंद्र चावरे काशिनाथ हाम्पले सह कार्यकर्ते,पदाधिकारी,गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रमाता जिजामाता शाळेमध्ये रानभाजी महोत्सव संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दिनांक २८ ऑगस्ट रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सिंदखेड राजा तालुका कृषी अधिकारी श्री पांचाळ, श्री गोपाळ गोरे कृषी अधिकारी, श्री रविंद्र जगताप मंडळ कृषी अधिकारी, श्री भगवान किंगर मंडळ कृषी अधिकारी, श्री बंगाळे साहेब, श्री तायडे साहेब, रेखा वाघमारे मॅडम श्री कांगणे साहेब कृषी पर्यवेक्षक, व श्री सचिन काळे बीटीएम आत्मा या कृषी अधिकाऱ्याच्या वतीने राष्ट्रमाता जिजामाता या शाळेमध्ये रानभाजी महोत्सव आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या रानभाज्या चे प्रदर्शन लावले होते त्यामधे कंटुले,वाघुटे , खडक शप्पू, फांदाची भाजी अशा अनेक प्रकारे रानभाजाची प्रदर्शन लावण्यात आले होते, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती देशमुख ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्याचे पंचायत समितीचे कृषी अधिकारी श्री अंकुश म्हस्के , विस्तार अधिकारी श्री दराडे , तसेच शिक्षणाधिकारी श्री खेडेकर तसेच सौ डॉ बुरुकुल मॅडम सिंदखेड राजा नगरीचे शेतकरी उद्योजक तथा शेतकरी मित्र दिलीप चौधरी इत्यादी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमांमध्ये कृषी व विभागामार्फत मुलांमध्ये अन्नाची गरज तसेच आधुनिक काळामध्ये जंक फूड न खाता रानभाजी आणि सकस आहार घेऊन निरोगी तसेच बौद्धिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी किती महत्त्व आहे याचे प्रात्यक्षिक तसेच मुलामार्फत रान भाजी चे महत्व विशद करण्यासाठी शाळेतील वक्तृत्व स्पर्धा तसेच विशेष करून मुलींसाठी पाक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती जेणे करून मुलांमध्ये रानभाजीचे महत्त्व ,आरोग्यासाठी फायदे लक्ष्यात येईल .सदर रानभाजी शाळेच्या मुलांनी आणून त्याचे महत्त्व सर्व उपस्थित अधिकारी , शेतकरी बांधव या रानभाजी चे महत्व समजावून सांगितले , शाळेतील मुलांनी वकृत्व स्पर्धामध्ये भाग घेतला असून ५ ते ७ व ८ ते १० वर्ग अशे दोन ग्रुप करून त्यांना प्रत्येकी तीन क्रमांकानुसार अनुक्रमे स्टडी टेबल , बॅग व डिक्शनरी (शब्दकोश)श्रीराम ॲग्रो अजेन्सी चे संचालक शेतकरी मित्र श्री दिलीप चौधरी यांच्या सौजण्याने पारितोषिक म्हणून देण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सह शिक्षक श्री गायकवाड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सह सह शिक्षक श्री निकम सर यांनी केले . सदर कार्यक्रमास शाळेचे सर्व शेतकरी शिक्षक वृंद ,कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

## डीजेच्या तालावर तरुणाई थिरकली;दहीहंडी महोत्सवाच्या नेत्रदीपक सोहळ्याने डोळ्याचे पारणे फिटले

# जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दही हंडी उत्सवास तौबा गर्दीने आष्टीकरांचे लक्ष वेधले

**आष्टीकरांचे दहीहंडी महोत्सवातील तौबा गर्दीने लक्ष वेधले..**

**पुणे,मुंबई या धर्तीवर मोठमोठ्या शहराप्रमाणे आष्टी शहरात प्रथमच भव्यदहीहंडी महोत्सव आपल्या ग्रामीण भागात पार पडला आणि या उत्सवास तरुणाईने तौबा गर्दी करत लक्ष वेधले.आष्टीकरांनी समाधान व्यक्त करत युवानेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळाच्या अतिशय शिस्तबद्ध नियोजनाबदल उपस्थितांनी आभार मानले..**





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

हाथी घोडा पालकी,जय कन्हैया लाल की. या जय घोषाने डीजेच्या तालावर थिरकलेली तरुणाई तर सात थरांची अंगावर शहारे आणणारा दहीहंडी पथकांचा तो जल्लोष आणि हा नेत्र दीपक सोहळा पाहण्यासाठी उसळलेल्या जनसागराने आष्टी करांचे पारणे फेडत तौबा गर्दीने लक्ष वेधले.

युवा नेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दहीहंडी महोत्सव २०२४ या कार्यक्रमास माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती. तर श्रीकृष्ण पूजा करून भव्य दहिहंडी कार्यक्रमांचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास धस,भाजपा तालुकाध्यक्ष ड.साहेबराव म्हस्के,युवा नेते सागर धस,युवा नेते तथा सरपंच राधेश्याम धस, प.स.माजी उपसभापती अजिनाथ सानप,माजी प.स.सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे यशवंत खंडागळे,एन. टी.गर्जे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

इंदापूर येथील व्यंकटेश पथकाच्या गोपाळांनी ही दहीहंडी फोडण्याचा मान पटकावित स्पर्धेत बाजी मारली.यावेळी विजेत्या संघास रोख स्वरूपात बक्षीस आणि सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

आष्टी शहरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा धार्मिक कार्यक्रमांनी विविध ठिकाणी उत्साहात पार पडला.यावर्षी प्रथमच आष्टी शहरात पंचायत समिती प्रांगणात बुधवार (दि.२८) रोजी जयदत्त धस मिंत्रमंडळाच्या वतीने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.दुपारी ४ वाजेपासूनच या महोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला.या दहिहंडी निमित्त प्रमुख आकर्षक बॉलीवूड अभिनेत्री सई मांजरेकर मराठी तारका मानसी नाईक श्री स्वामी समर्थ मालिकेतील भूमिका साकारणारी मोहिनी अवसरे प्रसिद्ध नृत्यांगना झेबा शेख यांची तर माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.लेजर लाईट शो, डि.जे.च्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि आकर्षक विद्युत रोषणाई व फटाक्यांची आतषबाजी याने या सोहळ्याची दिमाखात सुरुवात झाली.या महोत्सवात दोन संघांनी सहभाग घेत आपापली कामगिरी यावेळी चांगल्या पद्धतीने करून दाखविली.प्रथमतः इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथक व भिगवण येथील शिवरूद्र गोविंदा पथकाने सलामी दिली.यानंतर इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथकाने ७ थर लावून ही दहीहंडी फोडली आणि विजयाचे मानकरी ठरले.

याप्रसंगी माजी शिक्षण सभापती उध्दव दरेकर, जि.प.सदस्य माऊली जरांगे,सभापती बद्रीनाथ जगताप,ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर, गणेश शिंदे, नगराध्यक्ष जिया बेग,पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,माजी सभापती अशोक इथापे, महेश हंबर्डे,अमोल शिंदे,युवा नेते अभिजीत शेंडगे सरपंच उद्धव पवार,सरपंच अजित घुले,महेश खकाळ,युवराज बर्डे, माजी सरपंच राम धुमाळ,यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.नियोजनबद्ध आणि शिस्तबध्द आयोजन केलेल्या जयदत्त धस मित्र मंडळाच्या दहीहंडी महोत्सवाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांची २५ हजार रूपयांची मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड



शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांनी अंजली अनिल मोरे रा.आंचोली ता.नायगांव येथील गरीब शेतकऱ्यांच्या मुलीच्या मेंदूच्या ओपरेशन साठी तब्बल २५००० हजार रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

व्हि.पि.के उद्योग समूहाचे अध्यक्ष शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी नायगाव मतदार संघात गोरगरीब लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी नेहमीच धावून जात असतात, एकदा ठिकाणी आत्महत्या झाली असेल किंवा अपघातातून मुत्यू झाले असल्यास अशा कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्यानंतर ते कुटुंबावर मोठं आर्थिक संकट येते अशा अनेक कुटुंबाला गुरूजींनी फुल नाही फुलांची पाकळी म्हणून मदत करतात. आज तर त्यांचे मन किती मोठे आहे हे दिसले आंचोली येथील एका गरीब शेतकऱ्यांच्या मुलीच्या मेंदूचे ओपरेशन होते त्या कुटुंबावर मोठे संकटच कोसळले होते त्यांना ऐवठा पैसा कुठून आणायचा हा प्रश्न पडला त्यांना कोणत्या आमदारान मदत केली नाही किंवा स्वतः ला भावी आमदार म्हणून घेणारा नेता पुढे आला..पुढे आले ते तर फक्त गरिबीची जान असलेले, सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्मलेला शेतकरी नेता..मा. मारोतराव पाटील कवळे गुरूजी.

## शेगाव (खोडके) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तीन वर्ग खोल्याचे आ.मुटकुळे यांनी केले भूमिपूजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

सेनगाव तालुक्यातील शेगाव घोडके येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील दि २९ ऑगस्ट रोजी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते तीन वर्ग खोल्याची भूमिपूजन करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवर भा ज पा तालुका अध्यक्ष हिम्मतराव राठोड, विठ्ठलराव घोगरे, शंकरराव बोरुडे, संतोषराव खोडके, विजयराव डोखळे, साहेबराव खोडके, अरुण सर, अण्णा खोडके, शंतनू खोडके, भागवत विडोळे, माऊली जाधव, यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते पदाधिकारी व गावातील नागरिक उपस्थित होते,

## उदगीर येथील बुध्द विहार उद्घाटन समारंभाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राहणार उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । सुनिल बस्वराज हावा



उदगीर येथे नगरपरिषदेने उभारलेल्या बुद्ध विहाराचे उद्घाटन ४ सप्टेंबर २०२४ रोजी होत आहे. या कार्यक्रमाला भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. तसेच यादिवशी राज्य शासनाच्यावतीने आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानालाही त्या उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

या समारंभाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

राज्य शासनाने उदगीर नगरपरिषदेला दिलेल्या निधीतून उदगीर शहरातील तळवेस येथे बुध्द विहाराचे बांधकाम करण्यात आले आहे. कर्नाटकातील कलबुर्गी येथील बुध्द विहाराची प्रतिकृती असलेल्या उदगीर येथील बुध्द विहाराचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत ४ सप्टेंबर रोजी होणार आहे.

राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांच्या लाभार्थी महिलांचा गौरव ४ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत तयार करण्यात येत असून यासाठी जिल्हास्तरावर विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत.जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सर्व पथकांच्या प्रमुखांची बैठक घेवून मंगळवारी आढावा घेतला. तसेच प्रत्येक पथकाने आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पार पडण्याच्या सूचना केल्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## मा.सैनिक लक्ष्मण शिंदे यांची तंटामुक्ती अध्यक्ष तर उपाध्यक्षपदी कैलास ढवळे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



श्रीगोंदा तालुक्यात सर्वच निवडणुका बिनविरोध करून बिनविरोध गाव म्हणून नावलौकिक असले ढवळगाव मध्ये काल महात्मा गांधी तंटामुक्ती समितीची निवडणूक बिनविरोध करण्यात आली.उपसरपंच मनीषा राहुल बोरगे यांच्या अध्यक्षतेखली झालेल्या ग्रामसभेत त्रिदल आज माझी संघटनेचे सदस्य माजी सैनिक लक्ष्मन आनंदा शिंदे व कैलास शंकर ढवळे या दोघांचेच अर्ज आल्याने सर्व सहमतीने दोघांची निवड करण्यात आली.

तालुक्यातील बहुतांश गावात तंटामुक्ती समिती निवड करताना मोठ्या प्रमाणात वाद विवाद होऊन निवडणूक घेतली जाते व संपूर्ण गावात तनावाचे वातावरण तयार होत असते परंतु या सर्वाला ढवळगाव हे गाव मात्र गेल्या अनेक वर्षापासून अपवाद ठरत आहे गावातील ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य अतिशय नियोजन बद्धपणे कुठलीही निवडणूक हाताळताना कायदेशीर पणे व अतिशय काटेकोरपणे अभ्यासपूर्ण पद्धतीने निवडणूक बिनविरोध करतात म्हणून पंचक्रोशीत ढवळगाव चा आदर्श सर्व गावांनी घ्यावा अशी मागणी सर्रासपणे होताना दिसत आहे.बिनविरोध निवडणूक करण्यासाठी सरपंच विजय शिंदे व मा.सरपंच रवी शिंदे या दोघांचे कसब पणाला लागले होते व त्यांना ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यानी खंबीर पाठींबा दिल्याने हे शक्य झाले आहे.गावात सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था , व समित्या बिनविरोध होत असल्याने गांवात सर्वच ग्रामस्थ गुण्या गोविंदाणे राहताना दिसत आहे म्हणून गावात आनंदाचे वातावरण आहे

तंटामुक्ती समिती ही तंटा मिटवानेसाठी असते त्याचं निवडीत जर तंटा होऊन निवडणूक होत असेल तर त्याचा काहीही उपयोग नाही असे गावाचे म्हणने आहे म्हणून ही समिती बिनविरोध करणे गरजेचे आहे.यावेळी उपसरपंच मनीषा बोरगे,सरपंच विजय शिंदे,मा सरपंच रवी शिंदे ,मा उपासरपंच अजित वाळुंज ,अध्यक्ष लक्ष्मण शिंदे उपाध्यक्ष कैलास ढवळे , राहुल बोरगे ,ग्रा सदस्य बबन शिंदे , ग्रा सदस्य गणेश ढवळे , ग्रामसेवक गायकवाड भाऊसाहेब ,व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**श्री.गणेशराव बिरादार साहेब यांचे बारामती येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून प्रमोशन झाले आहे.त्याबद्दल त्यांचे दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी पत्रकार बाजीराव पाटील गायकवाड यांनी अभिनंदन करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.**

## हर्षवर्धन पाटील बावडा येथे रत्नाई निवासस्थानी जनतेशी साधणार सुसंवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे बावडा येथे रत्नाई निवासस्थानी शुक्रवारी (दि.३०) सकाळी ९ वाजले पासून जनतेशी व कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधणार आहेत.

हर्षवर्धन पाटील यांनी यापूर्वी जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये इंदापूर तालुक्यातील सर्व भागातील जनतेशी व कार्यकर्त्यांशी सुसंवाद उपक्रमाच्या माध्यमातून थेट संवाद साधला आहे. इंदापूर तालुक्यातील हर्षवर्धन पाटील यांची सुसंवाद कार्यक्रमाची पहिली फेरी पूर्ण झाली आहे.बावडा, कुरवली, भिगवण, पळसदेव,निमगाव-केतकी येथे यापूर्वी झालेल्या सुसंवाद उपक्रमांस जनतेचा व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला आहे. हर्षवर्धन भाऊ पाटील हे बावडा येथे पुन्हा शुक्रवारी होणाऱ्या सुसंवाद उपक्रमामध्ये जनतेला व कार्यकर्त्यांना भेटणार आहेत,अशी माहिती हर्षवर्धन पाटील संपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## उदगीरच्या बुध्द विहारच्या घुमटाचे रंगकाम करताना एकजण पडून जखमी,ठेकेदार बी.आर.आंन्दे यांच्यावर गुन्हा दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । सुनिल बस्वराज हावा

उदगीर शहरात लोकार्पण सोहळ्यासाठी महामाहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू येत असलेल्या बुध्द विहार च्या घुमटाचे रंगकाम करताना कामगार घुमटावरुन खाली पडल्याने नाकाचे, हाताचे आणि पायाचे हाड तुटले, तर अंगठा फ्रॅक्चर होऊन गंभीर जखमी झाला. याप्रकरणी बुधवारी (२८ ऑगस्ट) उदगीर शहर पोलीस ठाण्यात संबंधित गुत्तेदार विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि.४ जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास शहरातील बुध्द विहार येथे गुत्तेदार बी. आर. आंदे यांचे निष्काळजीपणे रंगकाम करून घेताना कोणतेही सुरक्षा व्यवस्था न पूरवल्याने फिर्यादीचा मुलगा नामे सोनू उर्फ अभिषेक उंचावरून खाली पडून गंभीर दुखापत होवून त्याचे डाव्या पायाचे हाड तुटले व नाकाचे हाड तुटले तसेच उजव्या हाताचा अंगठा फॅक्चर झाला. त्याला तातडीने पुणे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.याप्रकरणी सुलूबाइ सजंय चव्हाण (रा.काशीराम तांडा, नागलगाव ता.उदगीर) यांच्या फिर्यादीवरून उदगीर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं.२२९/२०२४ कलम १२५(ब) भारतीय न्याय सहिंता नुसार गुत्तेदार बी.आर.आंदे यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अक्षय पाटील हे करीत आहेत.

# लोहा-कंधार सह नांदेड जिल्ह्यात ओबीसीचे पाच आमदार निवडून आले पाहिजे-प्रा.लक्ष्मण हाके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा -कंधार सह नांदेड जिल्ह्यात ओबीसीचे पाच आमदार निवडून आले पाहिजे असे प्रतिपादन ओबीसी योध्दा प्रा. लक्ष्मण हाके यांनी लोहा येथे ओबीसी एल्गार सभेत केले. दि .२७ ऑगस्ट रोजी लोहा येथील राधाई मंगल कार्यालयात ओबीसी योध्दा प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे यांच्या ओबीसी एल्गार जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे यांनी सभेला मार्गदर्शन केले . यावेळी कार्यक्रमाचे आयोजक नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, जि.प. सदस्य चंद्रसेन पाटील,डॉ संजय पवार, माजी जि प अध्यक्ष संभाजीराव धुळगुंडे. अविनाश भोसीकर , देविदास राठोड , सदाशिव अंबुरे,बनसोडे सर, गंगाधर महाबले ,अंगद केंद्रे, माधव मुसळे, उतम चव्हाण,रमेश माळी ,युवराज वाघमारे ,दत्ता शेटे, सतीश आनेराव, परसराम वडजे, केरबा केंद्रे, क्रष्णा केंद्रे, वैभव हाके, लक्ष्मण फुलवरे, साई शिंदे ,संदिप दमकोडावार ,अमोल व्यवहारे,राजेश ढवळे, सुंदर सिंग राठोड,विठ्ठल खाडे ,पिन्टू वडे, मारोती पंदलवाड, चक्रधर डोके , गजानन कराडे,अशोक गिते, विजय केंद्रे, हारी शेटे ,किरन हाके,राहुल जोरुळे,किशोर कळसकर, यांच्यासह लोहा -कंधार मधील ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की जा आपल्या घरांच्या भिंतीवर जाऊन लिहा आपल्याला शासनकर्ती जमात व्हायचे आहे. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी टाटा, बिर्ला, अंबानी यांना ही एकच मताचा हक्क दिला आहे व सामान्य माणसाला ही एकच मताचा हक्क दिला आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या सह आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ६० ओबीसीचा केवळ वापर केला. त्यांनी आमदार, खासदार, साखर कारखान्याचे चेअरमन, शिक्षण संस्था, बॅंकेचे चेअरमन पद हे सर्व त्यांच्या नातेवाईकांना दिल्या.

तसेच मराठा आंदोलनाचे प्रणेते मनोज जरांगे, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. शामसुंदर शिंदे, प्रा.पुरूषोतम



धोंडगे यांच्यावर टिका करुन त्यांचा खरपूस समाचार घेतला. तसेच लोहा -कंधार मध्ये ओबीसीचे २ लाख २० हजार मतदान असुन येथे ओबीसीचा आमदार झाला पाहिजे त्यात नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, संजय पवार किंवा चंद्रसेन पाटील सुरनर यापैकी कुणीही होवो असे ते म्हणाले.यावेळी बोलताना लोहयाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी म्हणाले की, ओबीसी समाजाने कधी कुणाला विरोध केला नाही व यापुढेही करणार नाही त्यांना यापूर्वी सरकारने ओबीसी शिवाय आरक्षण दिले होते. आम्ही त्यांना समर्थन दिले होते व आम्ही त्यांच्या सोबत होतो पण आता त्यांना ओबीसीतुन आरक्षण पाहिजे आहे त्यांना आमचा विरोध आहे. आम्ही कुण्या जातीच्या विरोधात नाही ही विचारांची लढाई आहे. आता जर आपण जागरूक झालो नाहीत तर आपल्या आरक्षणाला धोका आहे. यावेळी आपण एकत्र आलो आहोत त्याला लोहा -कंधार मध्ये प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. यापुढे ओबीसीचे मतदान ओबीसीलाच पडले पाहिजे. मी ५ वर्ष ओबीसीचा नगराध्यक्ष होतो गेल्या २० वर्षांपासून लोहा येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे, लिंबोटीच्या पाण्याचे राजकारण केले पण मी ओबीसीचा नगराध्यक्ष असुन लोहयात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा बसविला, तसेच जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा बसविला मी, चंद्रसेन पाटील, डॉ.संजय पवार यांनी कुण्या न कुण्या नेत्यांसोबत राहिलोत इमानदारीने काम केले आहे .आज आपण एकत्र झालो आहोत हे काही लोकांना खपत नाही . आपल्याला ओबीसी आरक्षणासाठी एकत्र आले पाहिजे यापूर्वी चंद्रसेन सांगितले आम्ही तिघे ही एकच आहोत.

प्रा.लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांच्या सोबत राहायचे आहे ओबीसीचे आरक्षण वाचवायचे आहे असे नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी म्हणाले.तसेच लोहा शहरात लोहा न.पा.चे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी ओबीसी योध्दा प्रा लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांचे जंगी स्वागत केले अनेक जेसीबी द्वारे पुष्पवृष्टी केली व लोहा शहरांच्या परंपरेनुसार दीड क्विंटललचा खारिक खोबऱ्याचा हार घालून त्यांचे भव्य सत्कार करुन त्यांना ओबीसीचा लढा लढण्यासाठी बळ यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी लोहा शहरात हजारो ओबीसी बांधवांनी उपस्थिती होती.

# शुभ विवाह सोहळ्यात प्रविण मानेंनी धरला अंतरपाठ

## मनासारखा राजा आणि राजा सारखे मन चर्चेला आले उधान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

संपूर्ण इंदापूर तालुक्यात चर्चेचा विषय ठरलेल्या सोनाई प्रतिष्ठान आयोजित मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या दिमाखात नुकताच पार पडला. माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे तथा सोनाई परिवाराचे संचालक असलेल्या प्रविण माने यांनी या विवाह सोहळ्याचे संपूर्ण आयोजन केले होते.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात ६३ विवाह जोडप्यांना एक रुपया देखील खर्च करून दिला नाही.संपूर्ण खर्च सोनाई परिवाराने केला. याच विवाह सोहळ्याच्या कार्यक्रमाची चर्चा अद्याप संपूर्ण तालुकाभर होत असताना,आज



निमगाव केतकी येथील केतकेश्वर मंगल कार्यालय येथे भोंग - सुरवसे आणि भोंग - शिंदे यांच्या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित राहून प्रविण माने यांनी वधू-वरांस वैवाहिक जिवनासाठी शुभेच्छा दिल्या,तसेच मंगलाष्टकांच्या वेळी माने यांनी अंतरपाठही धरला. आणि सर्व मंगल कार्यालयात प्रविण माने यांनी अंतरपाठ धरल्याने मनासारखा राजा आणि राजा सारखे मन विषय चर्चेला आलेला ऐकायला मिळाला.

## उमरखेड आगाराने घेतली महिला सुरक्षेतेची जवाबदारी

# कर्तव्यदक्ष आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांनी वेळीच निर्णय घेतल्याने महिलांनी केले स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके ह्या वैयक्तिक कारणास्तव रजे वर होत्या. मात्र रात्री २२.३० वाजता सुरक्षा रक्षक श्री गावंडे यांना फोन कॉल करून आगाराच्या परिसर व कामकाजा बाबत विचारणा केली असता, श्री गावंडे यांनी शिवपुराण कार्यक्रम वरून ढाणकी येथे जाणाऱ्या महिला बसस्थानकवर असल्याचे सांगितले असता आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांनी अधिंस्त कर्मचारी यांना फोनवर सूचना देवून वेळ न वाया घालवता स्वतः च वाहन परीक्षक म्हणून कामकाज करणारे चालक श्री गजानन नंदनवार व वाहक श्री एस कदम यांना सूचना देवून महिलांना त्यांच्या गावाला गाडी सोडायला सांगितली.



या दरम्यान गाडी व मशीन घ्यायला वेळ लागणार होता तसेच पाऊस सुरू होता तेव्हा आगार व्यवस्थापक यांनी सुरक्षा रक्षक यांना बसस्थानकवर महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बसस्थानकवर थांबायला सांगितले.

आज ठीक ठिकाणी महीला असुरक्षित असल्याचे दिसून येते परंतु उमरखेड आगाराने राखीच्या पर्वावर महिलांना रात्री त्यांच्या गावी सुरक्षित सोडून माणुसकीचे दर्शन घडविले व रा प महामंडळ हे प्रवाशांच्याच सेवेसाठी आहे.

हे वाक्य खर करून महिलांना खऱ्या अर्थाने राखीची ओवाळणी दिली.या बाबत महिलेने चालक वाहक यांचे आभार मानले. कर्तव्यदक्ष आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांच्या पुढाकाराने या महिला सुखरूप आपल्या गावी पोहोचले याबद्दल किनाके मॅडम यांची सर्व स्तरावरून कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# लोणार येथे धर्मवीर महाकाल कावड यात्रेचे भव्य दिव्य मिरवणूक लोणार ते पळसखेड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथून दरवर्षी प्रमाणे यंदाही धर्मवीर महाकाल कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले शहरात ठिकठिकाणी रांगोळी काढून स्वागत करण्यात आले.फराळाचे वाटप करण्यात आले.यावेळी माननीय आमदार संजय रायमुलकर यांनी उपस्थित राहुन कावड यात्रेचे स्वागत करून कावड सोहळ्याचे शोभा वाढवली.यावेळी धर्मवीर महाकाल कावडचे आयोजक अध्यक्ष तथा उपस्थित शिव भक्त राहुल मापारी,हर्षल प्रकाश पाटील, नाना गरुडकर, विठ्ठल मापारी, सुनिल



मापारी, नितीन पाटील सुलताने,पांडु मापारी, नितीन मापारी ,आतिष मापारी ,ऋषि मापारी,व ईतर शिवसैनिक तसेच महाकाल भक्त उपस्थित होते.

# रिझर्व बॅंकेच्या नियमानुसार व्हीपीके पत संस्थेची नांदेड जिल्ह्यात यशस्वी वाटचाल



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सिंधी ता उमरी या छोट्याश्या गावातून इ.स.२००२ साली स्थापन करण्यात आलेल्या व्हीपीके पतसंस्थेच्या नांदेड जिल्ह्यात २० शाखांमध्ये मोठ्याप्रमाणात विस्तार करून गरुड झेप घेतांना दिसत आहे. आज या पतसंस्थेतील असंख्य कर्मचारी, संचालक मंडळांनी सहकार प्रशिक्षण केंद्र यशदा पुणे येथे प्रशिक्षण वर्गामध्ये रिझर्व बॅंकेचे सेवानिवृत्त अधिकारी श्री के.सी.मिश्रा सर यांच्या सारखें तंज्ञ मंडळींचे मार्गदर्शन त्यांना लाभत आहे.त्यामुळे भविष्यात ही संस्था आपल्या सर्वांच्या सहकार्याने आशिर्वादाने, मराठवाड्यातील एक नामांकित संस्था म्हणून व्हीपीके पतसंस्थेच नांव आल्याशिवाय राहत नाही हे आवर्जून सांगितले पाहिजे असे रिजर्व बॅंकेचे सेवा निवृत्त अधिकारी के.सी.मिश्रा यांनी म्हटले आहे.यावेळी संचालक मंडळी,अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# संत सावता गणेश मंडळ अध्यक्षपदी संदीप नाईकनवरे तर उपाध्यक्षपदी सांगळे, शेवाळे यांची निवड




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील मानाच्या गणेश मंडळा पैकी एक व अनेक वर्षी नंबर एकचे पारितोषिक मिळवणाऱ्या श्री संत सावता गणेश मंडळाची बैठक संत सावता महाराज मंदीर माळेगल्ली पाटोदा येथे संपन्न झाली. दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यासाठी श्री संत सावता महाराज गणेश मंडळाची बैठक झाली. या वर्षीच्या संत सावता गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप नाईकनवरे तर उपाध्यक्षपदी जितेंद्र सांगळे, राहुल शेवाळे तर सचिवपदी भागवत नाईकनवरे यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच सहसचिवपदी विशाल नाईकनवरे तर कोषाध्यक्षपदी ओम गोरे यांची निवड करण्यात आली. या वेळी संत सावता माळी गणेश मंडळाचे मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद विद्यालय बावी येथे मोठ्या आनंदात दहीहंडी उत्सव संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

दर्जेदार शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणारे शिक्षण या शाळेत दिले जाते तसेच सर्व उपक्रम राबवणारे,संस्कारशिल विध्यार्थी घडवणारे,आपले सण-उत्सव साजरे करून आपली संस्कृती जोपासणारे आणि महापुरुषांची जयंती-पुण्यतिथि शाळेमध्ये साजरी केली जाते तसेच देशभक्ती रुजविण्याचे कार्यही या शाळेमधून केले जाते.

त्याच पार्श्वभूमीवर स्वामी विवेकानंद विद्यालय येथे गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.यावेळी श्रीकृष्ण व राधिकेची वेशभूषा अनेक विद्यार्थांनी केली होती,श्रीकृष्णाच्या गीतांवर विद्यार्थ्यांनी विवीध नृत्य करत आनंद साजरा केला त्याचबरोबर काही विध्यार्थी गोविंदानी तीन थर तयार करून मटकी फोडली.इतर सर्व विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी केली.अतिशय खेळीमेळीच्या आणि आनंदी वातावरणात दहीहंडी उत्सवाच्या आनंद विद्यार्थ्यांनी यावेळी घेतला.

# कृषी दिंडीच्या माध्यमातून अजयदादा धोंडे यांचे आष्टीतील व्यापाऱ्यांना निमंत्रण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी येथे आजपासून होणाऱ्या मराठवाड्यातील सर्वात मोठया डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसऱ्या कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर,कृषि महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थ्यांनी आष्टी शहरातून कृषी दिंडी काढून व्यापाऱ्यांना युवा नेते अजय दादा धोंडे यांच्या हस्ते कृषी प्रदर्शनाची निमंत्रण पत्रिका देऊन कृषी प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन केले.




बुधवारी सकाळी कृषी महाविद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी,विद्यार्थ्यांनींनी कृषी दिंडी काढली.माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कृषी दिंडीची सुरुवात झाली. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजय दादा धोंडे यांनी कृषी दिंडीत सहभागी होऊन आष्टी शहरात फिरून प्रत्येक व्यापाऱ्यांना भेटून निमंत्रण पत्रिका देत कृषी प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन केले.यावेळी शेतकरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.बी.राऊत, प्राचार्य डॉ.श्रीराम आरसुळ, शिक्षक,विद्यार्थी उपस्थित होते. कृषी दिंडीमध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी शेतकरी वेश परिधान केला होता. जय जवान जय किसानच्या घोषणा दिल्या,तसेच हातामध्ये शेती उपयोगी अवजारे व शेती संबंधित साहित्य हातात घेऊन कृषी दिंडीत सहभागी झाले होते.व्यापाऱ्यांनी युवा नेते अजयदादा धोंडे यांचे ठिकठिकाणी स्वागत केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904